## INTERNAL NOTE

| |
|---|
| Ref. No:- BKC/MET/IOE/Library/२०२५-२६ |
| From:- NSS Program Officer, MET-BKC-IOE |
| To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik |
| Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik |
| Sub.: - सोमवार ०७/०७/२०२५ रोजी, "मेरा काम मेरी पहचान" ह्या उपक्रमाचे आयोजन करणे बाबत....... |
| Date: - ०५/०७/२०२५. |

### "आमंत्रण"

महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांना निमंत्रित करण्यात येते कि, मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या आवाहनास प्रयीसाद तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचणे नुसार "मेरा काम मेरी पहचान" ह्या उपक्रमाचे आयोजन करणे बाबत.

दिनांक **सोमवार** - ०७/०७/२०२५ रोजी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचणे नुसार "मेरा काम मेरी पहचान" ह्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

सदर दिवसी दिनांक **सोमवार** - ०७/०७/२०२५ रोजी आपण मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे, अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ यांच्यातर्फे हा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. तरी सर्व प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा.

दिनांक: **सोमवार** - ०७/०७/२०२५ वेळ: सकाळी ११.००
स्थळ: मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३

आपली उपस्थिती म्हणजेच आमच्या कार्यक्रमाची शोभा आहे.

धन्यवाद

| | | |
|---|---|---|
| **डॉ. संभाजी पाटील** | **प्रा. योगेश पाटणी** | **डॉ. विजयकुमार वाणी** |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |

प्रत : सर्व विभाग प्रमुख

MET's Institute of Engineering
NSS
BKC Adgaon, Nashik

## कार्यक्रम अहवाल

### "मेरा काम मेरी पहचान" – दिनांक सोमवार - ०७/०७/२०२५

विषय: "मेरा काम मेरी पहचान" उपक्रमाच्या आयोजनाचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत.

सविनय विनंती आहे की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रेरणेने तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून प्राप्त सूचनेनुसार "मेरा काम मेरी पहचान" या विशेष उपक्रमाचे आयोजन मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे दिनांक ०७ जुलै २०२५, सोमवार रोजी यशस्वीपणे पार पडले.

हा उपक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिट आणि मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विविध शाखांतील विद्यार्थी वर्ग यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

"मेरा काम मेरी पहचान" या उपक्रमामागील मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, आणि स्वच्छता जनजागृती या मूल्यांची रुजवण करणे हा होता. तसेच, स्वकष्टाने केलेल्या कार्यातून स्वतःची ओळख निर्माण करण्याचा संदेश विद्यार्थ्यांमध्ये पोहोचवण्याचा प्रयत्न यामाध्यमातून करण्यात आला.

उपक्रमाचे स्वरूप आणि आयोजन

१. कार्यक्रमाची रूपरेषा: दिनांक ०७/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

२. मुख्य उपक्रम: कार्यक्रमात खालील उपक्रम राबवण्यात आले:

(अ) वृक्षारोपण: महाविद्यालयाच्या परिसरात वसुंधरेचे संवर्धन व्हावे या हेतूने वृक्षांचे रोपण करण्यात आले. या रोपांचे संगोपन आणि देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित विभागातील NSS स्वयंसेवकांनी घेतली. वृक्षांची निवड पर्यावरणीय गरजेनुसार करण्यात आली.

(ब) घनकचरा व प्लास्टिक निर्मूलन अभियान: स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी आणि 'प्लास्टिकमुक्त भारत' या संकल्पनेस चालना देण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसर, ग्रंथालय, वसतिगृहे आणि परिसरातील रस्त्यांवर साफसफाई मोहीम राबवली. या मोहिमेत प्रत्येकाने प्लास्टिक वस्तू जमा करून त्याचे पर्यावरणपूरक नष्टिकरण केले.

ह्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. विशेषतः NSS स्वयंसेवकांनी संपूर्ण कार्यक्रमात पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी "मेरा काम मेरी पहचान" या घोषवाक्याचे महत्व समजून घेतले आणि आपल्या कृतीमधून त्याचा प्रत्यय दिला.

प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना 'कामातून ओळख' या मूल्यांची प्रेरणा दिली. त्यांनी सांगितले की, "कोणत्याही समाजाचा विकास हा त्या समाजातील तरुणांच्या कर्तृत्वावर अवलंबून असतो. आपण ज्या भूमीत वाढतो, तिचे रक्षण करणे आणि सुंदर बनवणे आपले कर्तव्य आहे." त्यानंतर पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुखांनी प्लास्टिक प्रदूषणाचे परिणाम, पर्यावरणातील बदल आणि त्यावर होणारा मानवी जीवनावर परिणाम याविषयी सखोल माहिती दिली.

MET's Institute of Engineering * NSS * BKC Adgaon, Nashik-3

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांमधून सकारात्मक अभिप्राय प्राप्त झाला. अनेक विद्यार्थ्यांनी असे मत व्यक्त केले की, "या उपक्रमामुळे आपणास सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली आहे. आता आपण आपल्या परिसरात असलेल्या स्वच्छता आणि हरित विकास उपक्रमांमध्येही सहभाग घेऊ." या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामूहिक भावना, जबाबदारीची जाणीव, आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्त्व रुजवले गेले.

या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. श्यामकुमार काळपांडे, डॉ. विठ्ठल गोंड, डॉ. शामराव गुमास्ते, डॉ. प्रशांत यावलकर, डॉ. पवन घुमरे, डॉ. दीपक कदम, डॉ. पुंडलिक जाधव, डॉ. विनोद खैरनार आणि डॉ. नमिता काळे यांचा सक्रिय सहभाग होता.





डॉ. संभोजी पाटील
ग्रंथपाल

प्रा. योगेश पाटणी
राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य